**Silent March against Human Trafficking**

# ‘मानवी तस्करी’विरोधात तरुणाईची मूक पदयात्रा

## शहरातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा सहभाग




मूकपदयात्रेत सहभागी झालेले मान्यवर व विद्यार्थी. (गोकूळ सोनार)

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : व्हिजन रेस्क्यू सामाजिक संस्था मुंबई, विधि व राज्य शासनाच्या विधि व न्याय विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली नूतन मराठा महाविद्यालय जळगाव यांच्या मुख्य आयोजनात व रायसोनी महाविद्यालय तथा समाजकार्य महाविद्यालय यांच्या सहकार्याने मानवी तस्करी विरोधात जळगाव शहरात शनिवारी मूक पदयात्रा काढण्यात आली.

या पदयात्रेत शहरातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन हातात घोषणा फलक घेऊन सामाजिक संदेश देण्यात आला.

प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख यांनी प्रास्ताविक केले, तर शासनाच्या वतीने ॲड. मंजूषा मुंदडा यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून सर्वांनी यावेळी सामूहिक प्रतिज्ञा घेतली.

### पदयात्रेत यांचा होता सहभाग

पदयात्रेसाठी व्हिजन रेस्क्यूचे समन्वयक विजय गढरी, राज्य शासनाच्या विधि व न्याय विभागाच्या वतीने जळगाव जिल्हा सत्र न्यायालयाचे ॲड. सलीम सैय्यद, ॲड. मंजूषा मुंदडा, ॲड. अब्दुल कादीर, प्रा. दिनेश पाटील व मुख्य आयोजक नूतन मराठा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख, उपप्राचार्या डॉ. माधुरी पाटील, समन्वयक डॉ. के. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. संजय पाटील, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. पी. बी. पाटील, राष्ट्रीय छात्रसेना अधिकारी प्रा. शिवराज मानके, क्रीडा अधिकारी सुभाष वानखेडे यांच्यासह सहभागी महाविद्यालयाच्या एनएसएस, एनसीसी आणि क्रीडा विभागातील समन्वयक तसेच नूतन मराठा महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि हजारोंच्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.